# निदेश

क्र. २९/२०२२ दि. २०/०४/२०२२

**विषय :- विद्यापीठ मालकीची निवासस्थान कर्मचा-यांना पुरविण्याबाबत**

ज्याअर्थी, विद्यापीठ मालकीची निवासस्थान कर्मचा-यांना पुरविण्याबाबतचे अनुक्रमे नियम क्र. २/१९९४ व २/२००० हे अस्तित्वात आहेत,

आणि

ज्याअर्थी, दि. २/१२/२०२१ रोजी झालेल्या विद्यापीठाचे आवारात असलेले निवासस्थान आंवटीत करणा-या समितीने कार्यवृत्तामध्ये मुद्दा क्र. ३ नुसार अस्तित्वात असलेल्या नियमाचे विनियमात परिवर्तन करण्यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता विद्यापीठ मालकीची निवासस्थान कर्मचा-यांना पुरविण्याबाबत मा. कुलगुरूंच्या मान्यतेने निदेश प्रसूत करण्यात यावा असे निर्देश दिले,

आणि

ज्याअर्थी, उपरोक्त समितीचे कार्यवृत्त मा. कुलगुरू यांनी मान्य केले,

आणि

ज्याअर्थी, नियम क्र. २/१९९४ व २/२००० यांचे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम ७५ (१) (च) चे अनुषंगाने विनियमाचे रुपाने विधान तयार करण्याकरीता लागणारा कालावधी विचारात घेता तुर्तास निदेशाचे रुपाने ही बाब अंमलात येईल,

त्याअर्थी, विनियम तयार करण्यास लागणार वेळ लक्षात घेता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ च्या कलम १२ (८) अंतर्गत असलेल्या तरतूदीनुसार मी, डॉ. दिलीप मालखेडे, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ खालीलप्रमाणे निदेश निर्गमित करीत आहे.

१) विद्यापीठ मालकीची निवासस्थान कर्मचा-यांना पुरविण्याबाबत निदेश, २०२२ असे या निदेशाला संबोधण्यात येईल.

२) सदरचा निदेश हा त्याचे निर्गमित दिनांकापासुन अंमलात येईल.

३) **व्याख्या :**

(अ) 'विद्यापीठ' म्हणजे महाराष्ट्र कायदा क्र. XXXVII/१९८३ अन्वये स्थापन झालेले अमरावती विद्यापीठ. तसेच XXI/२००५ अन्वये नामविस्तार झालेले संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ.

(ब) 'कर्मचारी' म्हणजे अमरावती विद्यापीठाच्या सक्षम प्राधिकारीणीने/अधिका-याने नियुक्त केलेले व सेवेत स्थायी /अस्थायी / एकत्रित मासिक वेतनावरील दैनिक वेतनिक असलेले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी.

(क) 'निवासस्थान' म्हणजे विद्यापीठाने स्वतःच्या मालकीचे बांधकाम करून निवासाकरिता आवश्यक सुविधासह उपलब्ध केलेले निवासस्थान.

४) अमरावती महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात ज्या कर्मचा-याचे नांवे स्वतःचे राहण्यासाठी घर नाही, फक्त अशाच कर्मचा-यांना निवासस्थान पुरविण्याबाबत विचार करण्यात येईल.

५) निवासस्थान मागणीसाठी कर्मचा-यास विहित नमुन्यातील अर्ज कार्यालयात सादर करावा लागेल. विहित अर्ज सामान्य प्रशासन विभागामधून उपलब्ध होऊ शकेल.

६) प्राप्त अर्जानुसार प्रथम अर्जदारास प्रथम या तत्वाने प्रतिक्षा यादी तयार करून उपलब्ध निवासस्थानातून कर्मचा-यास निवासस्थाने पुरविण्यात येतील. एकाच वेळी प्राप्त झालेल्या अर्जाचे संदर्भात रूजू दिनांकापासून जेष्ठतेप्रमाणे प्रतिक्षायादी तयार करण्यात येईल. कर्मचा-याला आवंटीत केलेल्या निवासस्थाना व्यतिरिक्त अन्य निवासस्थानात राहता येणार नाही.

७) कर्मचा-याच्या कामाचे स्वरूप व कामाची आवश्यकता पाहून प्रतिक्षा यादी लक्षात न घेता निवासस्थान पुरविण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

८) कर्मचा-यास दिलेल्या निवासस्थानासाठी कर्मचा-यास शासनाद्वारे मंजूर करण्यात येणारा घरभाडे भत्ता हा घरभाडे म्हणून वेतनामधून कपात करण्यात येईल. अस्थायी / एकत्रित मासिक वेतनावरील दैनिक वेतनिक कर्मचा-याला मिळणा-या एकत्रित वेतनातून दरमहा ५ टक्के इतकी रक्कम घरभाडे म्हणून वेतनामधून कपात करण्यात येईल. याशिवाय विज व पाणी शुल्क विद्यापीठाने वेळोवेळी ठरवून दिल्याप्रमाणे आकारण्यात येईल.

९) कर्मचा-याकडून पाणी व विद्युत शुल्क या दोन्ही करिता रु. १०००/- (अक्षरी रू. एक हजार) सुरक्षा ठेव म्हणून निवासस्थानाचा ताबा घेण्यापूर्वी कार्यालयामध्ये जमा करावी लागेल. निवासस्थान सोडतांना सदर रक्कम परत/समायोजित करण्यात येईल.

१०) निवासस्थानाच्या बांधकामात कर्मचा-याला कोणत्याही प्रकारचा फेरबदल करता येणार नाही.

११) निवासस्थानाचा उपयोग अवैधरित्या होत असल्याचे किंवा कर्मचारी/त्यांच्या कुटूंबियाकडून विद्यापीठ परिसरातील वास्तव्यामुळे परिसरातील अपेक्षित शांततेचा /संकेतांचा भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास सदर कर्मचारी/कुटूंबीय कार्यवाहीस पात्र राहील व त्यास तातडीने निवासस्थान रिकामे करणे बंधनकारक राहील.

१२) कर्मचाऱ्यास दिलेल्या निवासस्थानात पोट भाडेकरू ठेवता येणार नाही.

१३) निवासस्थान फक्त स्वतः राहण्याकरिता वापरता येईल. निवासस्थानाचा उपयोग इतर उद्योगधंदे, व्यापार, इत्यादी करिता करता येणार नाही.

१४) निवासस्थानाचा ताबा घेण्यापूर्वी कमीतकमी आठ दिवस आधी कार्यालयाला सुरक्षा अधिकारी यांचेमार्फत पूर्वसूचना देणे आवश्यक राहील.

१५) निवासस्थानधारकास विद्यापीठ सेवेत असतांना निवासस्थान स्वखुशीने सोडावयाचे असल्यास त्याने कार्यालयास ३० दिवसाची पूर्वसूचना देणे आवश्यक आहे.

१६) कर्मचाऱ्यास निवासस्थान दिल्याचे तारखेपासून ३० दिवसापर्यंत निवासस्थान सतत रिकामे राहिल्यास सदर कालावधीचे भाडे नियमाप्रमाणे त्याचे वेतनातून वसुल करण्यात येईल व सदर निवासस्थान दुसऱ्या कर्मचाऱ्यास देण्यात येईल. विद्यापीठाने दिलेल्या पूर्वसूचनेप्रमाणे कर्मचाऱ्यास दिलेल्या मुदतीत निवासस्थान रिकामे करून द्यावे लागेल.

१७) निवासस्थानाच्या सुरक्षिततेची तथा साफसफाईची जबाबदारी संबंधित निवासस्थान धारकाची राहील, ही जबाबदारी पार न पाडल्यामुळे होणाऱ्या नुकसानास संबंधित कर्मचारी जबाबदार राहील. निवासस्थानधारकास निवासस्थानात किंवा विद्यापीठ परिसरात कोणत्याही प्रकारचे प्राणी पाळता येणार नाही.

१८) कर्मचाऱ्याची सेवानिवृत्ती, राजीनामा, निष्कासन, सेवासमाप्ती किंवा इतर कारणामुळे विद्यापीठ सेवा समाप्त होत असल्यास त्याला सेवा समाप्तीच्या दिनांकापासून ३ महिन्याचे आत निवासस्थान रिकामे करून द्यावे लागेल. अन्यथा सदर कर्मचाऱ्यास देय असलेल्या रकमांचे शोधन निवासस्थान रिकामे करून देईपर्यंत किंवा अंशतः स्थगित ठेवण्यात येईल व सदर कालावधीची भाडे आकारणी व्यापारी तत्वावर करण्यात येईल.

विद्यापीठ निवासस्थान धारकाने स्वतःचे घर/गाळा महानगर पालिकेच्या परिक्षेत्रामध्ये बांधल्यास/ विकत घेतल्यास त्याला घर बांधल्यापासून/विकत घेतल्यापासून ३० दिवसांचे आंत विद्यापीठास सुचित करून विद्यापीठाचे निवासस्थान रिकामे करून द्यावे लागेल अन्यथा सदर कर्मचारी कार्यवाहीस पात्र ठरेल.

१९) निवासस्थानाचे वाटप निवासस्थान आवंटन समितीमार्फत तर निवासस्थानाची देखभाल/दुरुस्ती अभियांत्रिकी विभाग तसेच तपासणी व सुरक्षा, सुरक्षा अधिकारी यांचे मार्फत करण्यात येईल.

२०) निवासस्थानाचा ताबा घेण्यापूर्वी कर्मचाऱ्यास विद्यापीठाने ठरविल्याप्रमाणे करारनामा करावा लागेल. याशिवाय या निदेशात वेळोवेळी बदल करण्याचा अधिकार विद्यापीठाचा राहील. तसेच यात समाविष्ट नसलेल्या व वेळोवेळी प्रसृत केलेल्या इतर बाबी /निर्णय/अटी निवासस्थानधारकास बंधनकारक राहतील.

२१) कर्मचाऱ्याला त्याच्या स्वतःच्या मालकीचे घर अमरावती महानगरपालिकेच्या परिक्षेत्रात नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.

२२) विद्यापीठाच्या मालकीचे वर्गवारीनुसार नेमून देण्यात आलेले व रिक्त असलेले कोणतेही निवासस्थान (Assigned Quarter) विद्यापीठाच्या कोणत्याही शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यास त्यांच्या कामाची निकड लक्षात घेवून तात्पुरत्या स्वरुपात तसेच निदेशातील अटींचे अधीन राहून विशेष बाब म्हणून आवंटीत करण्याचे अधीकार मा. कुलगुरूंना राहतील.

२३) विद्यापीठाच्या मालकीच्या निवासस्थानांचे आवंटन खालील समितीमार्फत करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| अ) | कुलसचिव | अध्यक्ष |
| ब) | उपकुलसचिव / सहा.कुलसचिव (आस्था.) | सदस्य |
| क) | कार्यकारी अभियंता | सदस्य सचिव |

२४) या निदेशाव्दारे नियम क्र. २/१९९४ व नियम क्र. २/२००० हे रद्द करण्यात येत आहेत.

स्वा/-
दि. १७/०४/२०२२ (दिलीप मालखेडे)
कुलगुरू